# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-19.05.2026** **वार- मंगळवार**

---

**संचलन**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 150 व्या तुकडीचा दीक्षांत संचलन आणि पदवीप्रदान समारंभ आयोजित करण्यात आला आहे. पदवीप्रदान समारंभ येत्या 29 तारखेला सकाळी 11.00 वाजता प्रबोधिनीच्या हबिबउल्ला सभागृहात भारतीय पोलिस सेवेच्या निवृत्त अधिकारी आणि पुदुच्चेरीच्या माजी राज्यपाल डॉक्टर किरण बेदी यांच्या उपस्थितीत होणार आहे. दुसऱ्या दिवशी 30 तारखेला सकाळी 06 वाजून 40 मिनिटांनी दीक्षांत संचलन होणार असून त्यासाठी देशाचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**प्रश्नपत्रिका**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ‘डिप्लोमा इन टॅक्सेशन लॉ’ (डीटीएल) अभ्यासक्रमाच्या ‘लेखांकन आणि हिशोबशास्त्र’ विषयाची प्रश्नपत्रिका खासगी प्रकाशनाच्या पुस्तकातून जशीच्या तशी उचलण्यात आल्याचा आरोप विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे. विद्यापीठातर्फे नुकत्याच झालेल्या या विषयाच्या परीक्षेसाठी २०२५ च्या नवीन परीक्षा पद्धतीनुसार प्रथमच शंभर गुणांची प्रश्नपत्रिका तयार करण्यात आली होती. मात्र,

परीक्षा संपल्यानंतर प्रश्नपत्रिकेतील सर्व आठ प्रश्न हे ‘लॉयर्स कंपॅनियन ऑन लेखांकन व हिशोबशास्त्र फॉर डीटीएल’ या पुस्तकातून थेट उचलल्याचं निदर्शनास आल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे. या घटनेमुळे विद्यापीठाच्या परीक्षा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर आणि गुणवत्तेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले असून संबंधित प्राध्यापक आणि परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे.

**बैठक**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येणाऱ्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण (SIR) कार्यक्रमाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात आज सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील बहुउद्देशीय सभागृहात आयोजित बैठकीत विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाची माहिती, आयोगाने जाहीर केलेले वेळापत्रक तसेच जिल्ह्यातील तयारीचा आढावा घेण्यात आला.

**सूचना**

पुणे जिल्ह्यातील उत्पादनांची निर्यात वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र आणि राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, कार्यक्रम आणि धोरणांबाबत उद्योजकांना व्यापक माहिती मिळावी यासाठी माहिती आणि मार्गदर्शन कार्यक्रमांचं आयोजन करावं, अशा सूचना अपर जिल्हाधिकारी सतीश राऊत यांनी दिल्या आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात आज आयोजित जिल्हा निर्यात प्रचालन समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

**मेळावा**

“रोजगार मेळावा ही ग्रामीण भागातल्या युवा वर्गासाठी करिअरच्या प्रवासातील एक मोठी सुवर्णसंधी आहे,” असं मत आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केलं. संगमनेर इथं मालपाणी लॉन्सवर शिवसेना युवासेना, शंभूराजे युवा प्रतिष्ठान आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स यांच्या संयुक्त विद्यमाने रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं.त्यामध्ये ते बोलत होते.

**प्रदर्शन**

‘सुखी पांडा’, ‘देहम नेचरक्युअर’, ‘डिस्कव्हर नेचर’ आणि ‘शांतीवन, पाचगणी’ यांच्या संयुक्त विद्यमाने ‘प्रतिबिंब’ या छायाचित्र प्रदर्शनाचं पुण्यात २४ ते २६ मे २०२६ या कालावधीत आयोजन करण्यात आलं आहे. बालगंधर्व कलादालनात होणाऱ्या या प्रदर्शनाचं यंदाचं दुसरे वर्ष असून

व्यवसाय सांभाळून छायाचित्रणाची आवड मनापासून जपणाऱ्या १३ गुणी हौशी छायाचित्रकारांच्या कलाकृतींचा प्रदर्शनात समावेश आहे, अशी माहिती संयोजक केदार दंडगे आणि समीर चाफेकर यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.

**मुरघास योजना**

पशुसंवर्धन क्षेत्रात आधुनिकतेची जोड देऊन पशुपालकांना उद्योजक बनवण्यासाठी शासनाकडून 'मुरघास संयंत्र वाटप' ही महत्त्वपूर्ण योजना राबवण्यात येत आहे. या योजनेद्वारे पशुपालकांना मुरघास हार्वेस्टर आणि बेलर संयंत्रावर भरघोस अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार असून, जास्तीत जास्त पात्र पशुपालक तसंच शेतकरी समूहगटांनी याचा लाभ घ्यावा, असं आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ.किरण पाटील यांनी केलं आहे. आज पुण्यात झालेल्या बैठकीत ते बोलत होते.

**नीट निषेध**

देशातील वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी 'नीट' परीक्षा पेपर फुटीमुळे सर्वोच्च परीक्षा नियंत्रण यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत. ही केवळ गोपनीयता भंग पावल्याची घटना नसून, संपूर्ण शैक्षणिक प्रशासकीय यंत्रणेचे हे अपयश आहे, असे मत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे प्रदेश उपाध्यक्ष तसेच चलवादी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.हुलगेश चलवादी यांनी आज पुण्यात व्यक्त केलं.

दरम्यान, पुण्यातील विविध संस्था संघटनांनी या प्रकाराचा निषेध नोंदवला असून यातील आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा आणि सजग नागरिकांनी तअशी मागणी मन की बात मध्ये करावी, असं आवाहन एरंडवन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानं केली आहे.

**प्रवेशप्रक्रिया**

पिंपरी-चिंचवड इथल्या मोशी परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहामध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून बिगरव्यावसायिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या ११ वी प्रथम वर्षासाठी अंदाजे ५१ रिक्त जागांवर प्रवेश दिला जाणार आहे. प्रवेशित विद्यार्थ्यांना विनामूल्य भोजन, निवास, क्रमिक पुस्तके, अभ्यासिका, ग्रंथालय, इंटरनेट सुविधा, ओपन जिम तसेच शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असं सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागामार्फत कळविण्यात आलं आहे.

**बांगलादेशी**

पुणे विमानतळावरून गुवाहाटी, आसाम इथं पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या दोन बांगलादेशी महिलांसह एका अल्पवयीन मुलाला खडक पोलिसांनी विमानतळ पोलिसांच्या मदतीननं आज ताब्यात घेतलं. शाहीनूर बेगम शेख, शागुरिका बेगम युलिया शेख, आणि टोपू ऊर्फ मुराद अहमद शेख अशी ताब्यात घेतलेल्या संशयितांची नावे आहेत. पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरात अवैधरीत्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांविरोधात विशेष मोहीम राबवण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार ही कारवाई करण्यात आली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 37 पूर्णांक 05 तर किमान तापमान 25 पूर्णांक 05 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल, दुपारनंतर हलक्या पावसाचीही शक्यता आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत ; उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**